गुरुवार, दिनांक २८ एप्रिल, २०२२

अधिसूचना

क्रमांक : ४०/२०२२ दि. २८/०४/२०२२

विषय – पर्यावरण पुरस्कार – २०२१

सर्व सामान्यांच्या माहितीकरिता कळविण्यात येते की, पर्यावरण पुरस्कार प्रदान करण्यासंबंधीचे विनियम क्र. ४/२०१८ नुसार पर्यावरणासंबंधी विद्यापीठाला प्राप्त झालेल्या विविध पुरस्कारांच्या मूळ रकमेच्या व्याजातून विद्यापीठस्तरावर सुरु करण्यात आलेल्या '' **पर्यावरण पुरस्कार - २०२१** '' साठी **"गट - अ"** मधून **श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा (लाड), जि. वाशिम** यांची तर **"गट - ब"** मधून **प्रा.डॉ. हरिदास देविदास आखरे, श्रीराम नगर, शेगांव, जि. बुलढाणा** पुरस्कार निवड समितीने एकमताने निवड केली आहे.

पर्यावरणासंबंधी वृक्षारोपन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन, जनजागृती, जैवविविधता संरक्षण, संवर्धन व व्यवस्थापन, अपारंपारिक उर्जा स्त्रोताचा वापर व प्रसार या संबंधित केलेल्या महत्त्वाचे व उत्कृष्ट कार्याबद्दल **"गट - अ"** मधून **श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा (लाड), जि. वाशिम** यांना तर **"गट - ब"** मधून **प्रा.डॉ. हरिदास देविदास आखरे, श्रीराम नगर, शेगांव, जि. बुलढाणा** यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा **'पर्यावरण पुरस्कार – २०२१'** घोषीत करण्यात आला आहे.

स्वा/-
(डॉ. तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

अधिसूचना

क्रमांक : ४१/२०२२ दि. २८/०४/२०२२

विषय : २०२१-२०२२ शैक्षणिक सत्राची वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्ती.

सर्व सामान्यांचे माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्ती दाननिधी विनियम क्र. ३१/१९९८ मधील तरतुदीप्रमाणे, **कु. प्रिया यादवराव बोबडे** या विद्यार्थिनीने वाङमय स्नातक परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण करुन व या अभ्यासक्रमाच्या इतिहास विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करुन २०२१-२०२२ या शैक्षणिक सत्रामध्ये अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ येथे वाङमय पारंगत भाग-१ (इतिहास) या वर्गात प्रवेश घेतल्यामुळे, सदर विद्यार्थिनी २०२१-२०२२ या शैक्षणिक सत्राच्या रु. २,८००/- च्या वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेली आहे.

२०२१-२०२२ या शैक्षणिक सत्रामध्ये रु. २,८००/- (अक्षरी रु. दोन हजार आठशे फक्त) ची वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्ती कु. प्रिया यादवराव बोबडे यांना प्रदान करण्यात येत आहे.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ